माळीणच्या मदतीसाठी आमदार प्रशांत ठाकूर यांचा हात

५ लाख ७४ हजाराचा धनादेश मुख्यमंत्र्यांकडे सुपूर्द

पनवेल : प्रतिनिधी

आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्वतःचा वाढदिवस जल्लोषात साजरा न करता पुणे जिल्हयातील दरडग्रस्त माळीण गावाच्या मदतीसाठी पाच लाख रूपयांची देणगी देणार असल्याचे जाहीर केले होते, त्याप्रमाणे त्यांनी हा धनादेश मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये जमा करण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्याकडे बुधवारी (दि.१३) सुपूर्द केला.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्वतः पाच लाख रूपये निधी देण्याचे जाहीर करतानाच पनवेल विधानसभा मतदार संघातही मदतीचे आवाहन केले होते. या आवाहनाला उत्सफूर्त प्रतिसाद देत अनेकांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हाकेला साद देत माळीण गावासाठी मदतीचा हात दिला. महाराष्ट्र राज्यात काही ठिकाणी अतिवृष्टी तर काही ठिकाणी दुष्काळग्रस्त अशी विचित्र परिस्थिती आहे. या दरम्यान पुणे जिल्ह्यातील भिमाशंकर भागातील माळीण या गावावर अतिवृष्टीमुळे भूस्खलन होवून दरड कोसळली आणि संपूर्ण माळीण गावच जगाच्या नकाशातून नष्ट झाले. या आपत्तीग्रस्त घटनेमुळे महाराष्ट्रासह सारा देश हळहळला. माळीण येथील दरडग्रस्त मृतांच्या नातेवाईकांच्या सहाय्यासाठी पनवेल विधानसभा मतदार संघातून सहकार्य व्हावे असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले होते. त्यानुसार आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपला वाढदिवस जल्लोषात साजरा न करता स्वतःचे पाच लाख रूपये तसेच कार्यकर्ते व हितचिंतकांनी माळीण आपत्तीग्रस्तांसाठी आर्थिक मदत देवू केली.

यामध्ये मे.माऊली इंटरप्रायझेसने २१ हजार रूपये, मेडिकल असोसिएशनचे दिपक मिरानी यांनी ११ हजार रूपये, सुनिल गोविंद पाटील यांनी ११ हजार रूपये, रामदास नारकर यांनी ११ हजार रूपये, सेवानिवृत्त शिक्षिका अंजलीदेवी पालकर यांनी ५ हजार, आंध्र कला समितीने ५ हजार ५५० रूपये, युवा नेते उदित कुमार नाईक यांनी पाच हजार रूपयांची तर महेंद्र माळी, गुरूनाथ भोपी, विश्वजीत पाटील व परमेश्वर गिरे यांनी प्रत्येकी एक हजार १११ रूपयांची देणगी आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडे जमा केली होती. आज आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्वतःचे पाच लाख रूपये व कार्यकर्ते व संस्थांनी दिलेली देणगी असे एकूण ५ लाख ७४ हजार १०५ रूपयांचा धनादेश मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्याकडे सुपूर्द केला.